## प्राचार्य डॉ. विवेक नानोटी यांचे आवाहन; रामन विज्ञान केंद्राच्या नवप्रवर्तन महोत्सवाचे उद्घाटन

# शिक्षणासोबतच नवनवीन आविष्काराची कास धरा

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** नेहमी शिकत राहा. समाजात काय आणि कसे योगदान देऊ शकतो, याचा विचार करा. फक्त शिक्षण तुम्हाला यश मिळवून देऊ शकत नाही, पण एक आविष्कार तुम्हाला नक्कीच उंचीवर घेऊन जाईल. त्यामुळे शिक्षणासोबतच नवनवीन आविष्काराची कास धरा, असे आवाहन प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक नानोटी यांनी केले.

जागतिक पातळीवर नवप्रवर्तनाच्या वाढत्या मागणीला पूरक म्हणून रामन विज्ञान केंद्रात नवप्रवर्तन केंद्र विकसित करण्यात आले आहे. यात विद्यार्थी व इतर अनेकांना त्यांच्या नवकल्पनांना मूर्तरूप देण्याची संधी दिली जाते. गुरुवार १३ ते १५ फेब्रुवारी २०२० पर्यंत केंद्रात नवप्रवर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन आज १३ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता प्रियदर्शनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक नानोटी यांच्या हस्ते व पुण्यातील ग्रीन वेन्सन बायोटेकचे संस्थापक व संचालक डॉ. प्रशांत अग्रवाल यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर रामण विज्ञान केंद्राचे प्रकल्प समन्वयक विजय शंकर शर्मा होते. जगाची लोकसंख्या वेगाने वाढत आहे, उद्याच्या गरजेचा विचार करा आणि नाविन्यपूर्ण व्हा, असे प्रतिपादन पुण्यातील ग्रीन व्हेन्शन बायोटेकचे डॉ. प्रशांत यांनी केले. महोत्सवात श विज्ञान व अ महाविद्यालयातील सुम नवसंशोधक त्यांच्या ३ प्रकल्पांसह सहभागी झा उद्घाटन सोहोळ्याला रा केंद्राचे शिक्षण अधिका चौधरी, अभिमन्यू अभिरक्षक एम.के. पांडा होते.




महोत्सवाचे उद्घाटन करताना डॉ. विवेक नानोटी, डॉ. प्रशांत अग्रवाल, विजय शंकर शर्मा, विलास चौधरी.

### लक्षवेधी प्रयोग

गुरुनानक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे विद्यार्थी मनिष देशमुख व अर्जुन जामुनकर या विद्यार्थ्यांनी मांडलेली नाविन्यपूर्ण घराची संकल्पना लक्षवेधक ठरत आहे. या घराच्या प्रवेशद्वाराजवळ गतिरोधक लावण्यात आले असून वाहन गतिरोधकाजवळ पोहोचताच प्रवेशद्वार उघडते. घराला आग लागण्याचे संकेत देणारे 'फायर अलार्म' आहे. पाऊस पडल्याची सूचना देणारा 'अलार्म' आहे. पाण्याची टाकी भरत आली असेल किंवा ती रिकामी झाली असेल, तर तशी सूचना देणारी यंत्रणा आहे. भूकंपाचा परिणाम न होणारी अशी वास्तू या दोन्ही विद्यार्थ्यांनी तयार केली आहे.

### पर्यावरणपूरक दुचाकी

अंजुमन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मोहम्मद इरफान अन्सारी राशिद, अमन शेंडे आणि आकाश कुशवाह यांनी दुचाकी पर्यावरणपू करणारी यंत्रणा तयार केली आहे. दोन ते तीन तासात या दुचाकीला ल बॅटरी चार्ज होते आणि ५२ किलोमीटरचा प्रवास त्यावर होऊ शकतो. किलोमीटर दर तासाच्या हिशेबाने ही दुचाकी बॅटरीवर धावू शकते. त्‍ अवघा २० रुपये खर्च येतो.